# अन्य मराठी साहित्य संमेलनासाठी साहित्य संस्थांना मंडळाचे अनुदान

महाराष्ट्रात आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य मराठी साहित्य संमेलनासाठी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत असणाऱ्या साहित्य संस्थांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी सहायक अनुदान देण्यासाठी पात्र संस्थांकडून दिनांक १ जून, २०१९ ते ३० जून, २०१९ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. साहित्य संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या व महाराष्ट्रात अन्य मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्या साहित्य संस्था अनुदानासाठी अर्ज करु शकतील. साहित्यबाह्य क्षेत्रात काम करणाऱ्या म्हणजेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विज्ञान, क्रिडा, कृषी, आरोग्य, पर्यावरण व अध्यात्मिक इत्यादी, यांसारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुउद्देशीय संस्थांना अनुदानासाठी अर्ज करता येणार नाही. विहित नमुन्यातील अर्ज व नियमावली www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'अन्य मराठी साहित्य संमेलनासाठी अनुदान' या शीर्षाखाली 'what's new' या सदरात 'Grant in Aid for Annya Marathi Sahitya Sammelane' या शीर्षाखाली, तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या www.sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर 'नवीनतम संदेश' या सदरात 'अन्य मराठी साहित्य संमेलनासाठी अनुदान' शीर्षाखाली उपलब्ध होतील. तसेच सदर अर्ज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ (०२२ - २४३२ ५९३१) येथे वरील विहित कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील. सदर अनुदानासाठीचे अर्ज विहित नमुन्यात व विहित कालावधीत (दि. १ जून, २०१९ ते ३० जून, २०१९) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे सादर करणे बंधनकारक राहील. विहित कालमर्यादेनंतर (दि. १ जून,२०१९ ते ३० जून, २०१९) येणाऱ्या अर्जाचा अनुदानासाठी विचार केला जाणार नाही.

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

D:\Santosh\2019\Anya marathi sahitya sammelan.letter

## अन्य मराठी साहित्य संमेलनाकरीता संस्थेने अनुदानार्थ करावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १) | संस्थेचे नाव व पत्ता (नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक) | :- |
| २) | संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक | :- |
| ३) | संस्थेकडून आयोजित करण्यात येणाऱ्या साहित्य संमेलनाचे नाव,स्वरूप, कितवे संमेलन आहे,संमेलनाचे स्थळ व दिनांक | :- |
| ४) | संस्थेचे स्वरुप, कार्यक्षेत्र व उद्देश | :- |
| ५) | संस्थेची घटना/ नियमावली आहे काय ? असल्यास, त्यास शासन मान्यता आहे काय ? (घटना/ नियमावली सोबत जोडणे आवश्यक) | :- |
| ६) | संस्थेचे कार्यकारी मंडळ आहे काय ? असल्यास, कार्यकारिणीच्या सदस्यांची नांवे व पत्ता | :- |
| ७) | संस्थेतर्फे शासकीय/निमशासकीय उपक्रम राबविण्यात आले आहेत काय ? असल्यास, संस्थेने राबविलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती द्यावी. | :- |
| ८) | संस्थेस यापूर्वी शासकीय/ निमशासकीय किंवा खाजगी अनुदान/ अर्थसहाय्य प्राप्त झाले होते काय ? असल्यास, किती व कोणातर्फे ? | :- |
| ९) | सनदी लेखापालाकडून संस्थेचे लेखा परिक्षण करुन घेतलेले आहे काय ? असल्यास, मागील तीन वर्षांच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत सादर करावी | :- |
| १०) | संस्थेने शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता केली आहे काय ? असल्यास, किती अटी व शर्तीची पूर्तता केली आहे ? | :- |
| ११) | संस्थेची इमारत स्वतःच्या मालकीची आहे वा भाड्याची आहे याबाबतची सविस्तर कागदपत्रे जोडावीत | :- |
| १२) | संस्था अनुदानास पात्र ठरल्यास संस्थेस एन.ई.एफ.टी. द्वारे अनुदान वितरीत करण्यासाठी संस्थेच्या बँक खात्याची अचूक माहिती इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेमध्ये सोबतच्या जोडपत्र 'अ' मध्ये सादर करावी | :- |

प्रमाणित करण्यात येते की, संस्थेतर्फे देण्यात आलेली वरील सर्व माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, संस्था शासन नियमानुसार कार्यवाहीस अपात्र ठरविण्यात यावी व सदरहू संस्थेस कोणत्याही प्रकारचे अनुदान / अर्थसहाय्य देऊ नये किंवा यापुढेही देण्यात येऊ नये.

आपला

दिनांक :

ठिकाण :

( )

अध्यक्ष / सचिव

**अन्य मराठी साहित्य संमेलन आयोजित करणाऱ्या संस्थांकरीता निकष :- (नियमावली)**

१) साहित्य संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या व महाराष्ट्रात अन्य मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्या साहित्य संस्था अन्य मराठी साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी अर्ज करू शकतील. साहित्यबाह्य क्षेत्रात काम करणाऱ्या म्हणजेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विज्ञान, क्रिडा, कृषी, आरोग्य, पर्यावरण व अध्यात्मिक इत्यादी, यांसारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुउद्देशीय संस्थांना अनुदानासाठी अर्ज करता येणार नाही.

२) महाराष्ट्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने अर्जदार साहित्य संस्थांनी अर्ज परस्पर शासनास सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

३) अशा संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असाव्यात. मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्था अनुदानास पात्र असणार नाहीत.

४) अनुदानासाठी अर्ज करणारी साहित्य संस्था किंवा मंडळ किमान ५ वर्षे साहित्य क्षेत्रामध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.

५) अर्जदार साहित्य संस्थांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक राहील.

६) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मंजूर होणारे अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व यासंदर्भातील अनुदानाचे सर्वसाधारण नियम व अटी संस्थांना लागू होतील.

७) अर्जदार संस्थेने आपले ध्येय धोरण एकदा स्पष्ट केल्यानंतर व या संदर्भातील अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केल्यावर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

८) अर्जदार संस्थेने, संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व त्या वर्षातील जमा खर्चाचा तपशिल विनियोजन विवरणपत्रासह विहित कालमर्यादेत अनुदान मंजुरीच्या वित्तिय वर्ष अखेरपर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर संस्था पुढील वर्षी अनुदान मंजुरीसाठी अपात्र ठरेल.

९) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अन्य साहित्य संमेलनांसाठी मंजूर केलेले अनुदान अन्य प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे केल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा संस्थेविरुध्द गैरव्यवहाराची कारवाई करण्यात येईल.

१०) अर्जदार संस्थेने मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) लेखापरिक्षित केलेले लेखा अहवाल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल अर्जदार संस्थेचा / संमेलनाचा सदस्य नसावा.

११) शासनाने दिलेल्या निधीचा उपयोग अन्य मराठी साहित्य संमेलनांसाठीच करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र संस्थेने देणे बंधनकारक राहील.

१२) शासनाने दिलेल्या अनुदानाच्या खर्चाचा हिशोब शासनमान्य अधिकृत लेखापालाकडून सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

१३) अर्जदार संस्थेकडील अर्थसहाय्याबाबतची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई किंवा त्यांचे अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

१४) वरील निकषांच्या आधारे अर्जदार संस्थांची निवड करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास असतील.

१५) सदर योजनेअंतर्गत अन्य मराठी साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण व अचूक माहिती भरून आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक राहील. माहिती अपूर्ण असलेला व आवश्यक कागदपत्रे सादर न केलेला अर्ज अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

# जोडपत्र अ

## ई-सी.एस/एन.ई.एफ.टीद्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठी तपशिल

१) मागणीद्वार/पुरवठादार/कंत्राटदाराचेनाव/फर्मचे नाव :

२) कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी लागू आहे :

३) बँक खाते क्रमांक :

४) बँक खात्याचा प्रकार :

५) बँके चे नाव :

६) बँक शाखेचे नाव व पत्ता :

७) बँक शाखेचे सांकेतांक :

८) एम.आय.सी.आर.क्रमांक :

९) आय एफ.एस.सी.संकेतांक :

---

दिनांक                                   कंत्राटदार/पुरवठादार/मागणीदाराचीसही

---

बँके चे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

शाखा प्रमुख

बँक शाखेचे नांव व शिक्का